क्र.मनपा/नसवि/२/विस/ ०२ /२०१८-२०१९
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २६ / १२ /२०१८

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका विशेष सभा क्रमांक - ०२ /२०१८-२०१९

## महानगरपालिका विशेष सभेची नोटीस

**(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका कामकाज कलम १(ड) अन्वये)**

प्रति,
मा........................................................................................

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ड) (ह) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची विशेष सभा **शुक्रवार दि. ०४ / ०१ /२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता** पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय सांगली येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

२६.१२.१८
**महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. स्ट्रीट लाईटींग नॅशनल प्लॅन (SLNP)अंतर्गत इस्को (ESCO) मोड मध्ये एनर्जी इफिशिअन्सी सर्व्हिसेस लि.(EESL) यांचेमार्फत महापालिका स्थलसिमेमध्ये एल.ई.डी.प्रकल्प राबविणेस मान्यता मिळणेकामी विचारार्थ व निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (सार्व.बांधकाम (विद्युत) विभाग) यांचे दि.१७/१२/२०१८ चे विषयपत्र.**

२. महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीबाबत आवश्यक त्या उपाययोजना करणेबाबत चर्चा करणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

२६.१२.२०१८
**महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**विशेष महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- ०४/०१/२०१९

ठराव क्रमांक :- १०३

विषय क्रमांक :- ०१

---

सोबतचे उपायुक्त (सार्व.बांधकाम (विद्युत) विभाग) यांचे दि.१७/१२/२०१८ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

स्ट्रीट लाईटींग नॅशनल प्लॅन (SLNP)अंतर्गत इस्को (ESCO) मोड मध्ये एनर्जी इफिशिअन्सी सर्व्हिसेस लि.(EESL) यांचेमार्फत महापालिका स्थलसिमेमध्ये एल.ई.डी.प्रकल्प राबविणेस मान्यता मिळणेकामी विचारार्थ व निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. याकामी राज्य शासनाचे उर्जा संवर्धन धोरण दि.२२/०६/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित केलेले आहे. त्यानुसार पथदिवे बसविताना फक्त एल ई डी पथदिवे बसविणे बंधनकारक केलेले असून, सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात EESL च्या माध्यमातून एस्को तत्वावर एल ई डी पथदिवे बसविणेसाठी करारानामा करणेचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर प्रकल्प सात वर्ष कालावधी करीता राबविणेत येणार असून, त्यामध्ये महापालिका स्थलसिमेतील कन्व्हेन्शनल दिवे बदलून योग्यत्या वॅटेज् चे एल ई डी दिवे बसविणेत येणार आहेत. यामध्ये महापालिकेची कोणत्याही प्रकारची गुंतवणूक होणार नसून, सदर प्रकल्पातून जी उर्जा बचत होणार आहे. त्यातील हिस्सा सदर कंपनीस सात वर्षे कालावधीमध्ये देणेत येणार आहे. सात वर्षानंतर सदर दिवे महापालिकेस कंपनीकडून सुस्थितीमध्ये हस्तांतरीत होणार आहेत. याबाबत सभागृहामध्ये सविस्तर चर्चा करणेत आली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

EESL यांचा प्रकल्प महापालिका स्थलसिमेत राबवित असताना, फक्त LED दिवे कंपनीकडून बदलणेत येणार आहेत. त्यासाठी आवश्यक असणारे इन्फ्रास्ट्रक्चर उदा.पोल उभारणी, अंडरग्राऊंड ओव्हरहेड केबलींग अशा स्वरुपाच्या सर्व कामगिऱ्या महानगरपालिकेस कराव्या लागणार आहेत. त्यासाठी अंदाजे १५ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, शासनाने जर, महापालिकेस या योजनेसाठी १५ कोटी निधी उपलब्ध करुन दिल्यास, सदरची योजना राबविणेबाबत विचार करता येईल. तसेच, प्रस्तुतचा प्रकल्प राबविणेसाठी आवश्यकते इन्फ्रास्ट्रक्चर उभा करणेस सद्या महापालिकेची यंत्रणा सक्षम नाही. महापालिकेची यंत्रणा जोपर्यंत सक्षम होत नाही. तोपर्यंतच्या कालावधी मध्ये प्रस्तुतचा विषय ही सभा प्रलंबित ठेवीत असून, दरम्यानचे कालावधीत नागरिकांची गैरसोय टाळणेच्या दृष्टीने व शासन निर्णयास अनुसरुन LED दिवे बसविणे बंधनकारक असलेने आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४९ नुसार दिवाबत्तीची सोय करणे ही महानगरपालिकेची जबाबदारी असल्याने, सदस्यांचे मागणीनुसार महापालिका स्थलसिमेत पथदिवे व त्यास लागणारे अनुषंगिक साहित्य महापालिकेकडून खरेदी करणेस व बसविणेस ही सभा मान्यता देत असून, त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

शहर अभियंता (विद्युत)

सूचक :- Y. S. Bamnmr
(मा- युवराज बावडेकर)

~~विषयपत्राच्या विसंगत ठराव पारित झाला असलेने, मा-आयुक्त यांचे निदर्शनास आणणेत यावा.~~

अनुमोदक :- [signature]
(मा- प्रकाश ढंग)

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]
महापौर,

[signature]
महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

[signature]
(अप्पी पाटील)

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**विशेष महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- ०४/०१/२०१९

ठराव क्रमांक :-

विषय क्रमांक :- ०२

---

महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीबाबत आवश्यक त्या उपाययोजना करणेबाबत चर्चा करणेच्या विषयावर सभागृहामध्ये विस्तृतपणे चर्चा करणेत आली. त्यामध्ये खाली नमुद केलेप्रमाणे मुद्दे प्रामुख्याने सदस्यांकडून सूचित करणेत आले.

१. मा.सविता मदने — महापालिका क्षेत्रातील सर्व हॉस्पिटलची नोंद घेणे
२. मा.नसिमा शेख — स्टेशन चौकातील गांधी व नेहरु पुतळा यांच्या मधील मोकळया जागेमध्ये पे-पार्किंग करणे.
३. मा.विजय घाडगे — महापालिका क्षेत्रातील ले-आऊट चेक करणे.
४. मा.करण जामदार — मिरज महापालिका कार्यालयाच्या पाठीमागील जागा भाड्याने देणे
५. मा.राजेंद्र कुंभार — गाळे भाड्याने देत असताना प्रतिवर्षी १०ते २०% भाडेवाढ करणे, थकीत एलबीटी वसुल करणे, लायसन्स् रिन्युव्हेशन करणे, शॉपिंग सेंटर सर्व्हे करणे इ.
६. मा.योगेंद्र थोरात — मोबाईल वायफाय टॉवर महापालिकेकडून पुरविणे.
७. मा.भारती दिगडे — पे-पार्किंगच्या जागा विकसीत करणे.
८. मा.लक्ष्मण नवलाई — महापालिका क्षेत्रातील रस्त्याखालून दिल्या जाणाऱ्या केबल वाहिनी बाबत आकारणी करणे.
९. मा.निरंजन आवटी — मिरज विभागातील गाळ्यांची मुदतवाढ करणे
१०. मा.जगन्नाथ ठोकळे — उद्योगांचे लायसन्स् रिन्युव्हेशन करणे.
११. मा.संतोष पाटील — मोकळ्या जागेवर कर आकारणी करणे, पे-पार्किंग करणे, वि.स.खांडेकर वाचनालय इमारतीमधील गाळ्यांचे फेर टेंडर काढणे.

उपरोक्त सूचना व सभागृहातील उपस्थित केलेल्या चर्चा यांचा विचार करता, प्रत्येक विभागाने उत्पन्न वाढीसाठी स्वतंत्र अहवाल देणे आवश्यक असून, मालमत्ता,घरपट्टी,पाणीपट्टी,नगररचना तसेच, आरोग्य विभाग यांचेकडून उत्पन्न वाढीसाठी अहवाल घेवून, ते दर सुधार समिती समोर सादर करणेत यावेत. दरसुधार समितीकडून याबाबत सविस्तर अहवाल प्राप्त झालेनंतर याबाबत पुन:श्च एकवेळ स्वतंत्र बैठकीचे आयोजन करुन, सर्वानुमते निर्णय घेणे योग्य होईल.

सूचक :- (स्वाक्षरी)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,